१९८२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५६१

# प्रतिस्पर्धी

[ ३ नृत्य संगीतिका ]

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

REFBK-0012756
REFBK-0012756

प्रभाकर पाध्ये,
ठाणें.

२।७।१९६२

३२२२३
४।२।६२
१५६९

३ नृत्य - संगीतिका

# प्रतिस्पर्धी

REFBK-0012756

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलमत.
अनुक्रम ...... विः ......
क्रमांक ...... नोंः दिः ......
म. ग्रं. ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संग्रह शाखा

प्रभाकर पाध्ये

किंमत १०० नवे पैसे

प्रकाशक—

**प्रभाकर पाध्ये**

पारंगत, विशारद अनु. पंडित

रघुनाथ सदन, कोपरी रस्ता,

नौपाडा, **ठाणें.**

**प्रथम आवृत्ति**

**१४ जानेवारी १९६२**

*

*

**पुनर्मुद्रण-प्रयोगासंबंधी**
**सर्व हक्क प्रकाशकाधीन**

*

मुद्रक—

**गो. धों. फडके,**

अरुणोदय छापखाना,

नगरपालिकेजवळ, **ठाणें.**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों. दि. ... ४।२।६२

'निवारा'
घंटाळी रस्ता,
नौपाडा, ठाणें.
११ जानेवारी १९६२

*प्रिय पाध्ये,*

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या परीक्षा वर्गांच्या निमित्तानें झालेल्या अपल्या परिचयावरून मी तुम्हांला हिंदीचे पारंगत, साहित्य-विशारद व व्याकरण तज्ज्ञच समजत होतों. पण तुम्ही चांगल्या कविताहि करूं शकतां या गोष्टीचा शोध नुकताच कांहीं दिवसांपूर्वीं मला लागला. आतां तर त्याचा पुरावाच हातीं आला आहे. 'प्रतिस्पर्धी' या शीर्षकाखालीं संकलित केलेल्या तुमच्या तीनहि मुद्रित संगीतिका मीं वाचल्या. त्या वाचल्यापासून तुमच्या सर्वच कविता वाचायला मिळाव्या अशी इच्छा झाली आहे.

तुम्ही स्वतः अनुभवी अध्यापक आहां. त्यामुळें विद्यार्थी जीवनाशीं तुमचा सतत संबंध आहे. या संस्कारक्षम विद्यार्थीमनावर इष्ट परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीनें संगीतिकांच्या कथावस्तूची निवड कशी करावी, ही दृष्टि तुम्हाला लाभली असल्याचें प्रत्यंतर आलें. यांतील एका संगीतिकाचा तर शाळेंतील संमेलनप्रसंगीं प्रयोग झाला असून दुसऱ्या संगीतिकेचा प्रयोग पुढील महिन्यांत होणार आहे. यापेक्षां यशस्वितेचें दुसरें प्रमाण कोणतें हवें ? अशा प्रयोग-सुलभ कलाकृतींची खरोखर वाण आहे. तुमचा हा प्रयत्न या दृष्टीनें खचित स्वागतार्ह आहे.

पहिल्या संगीतिकेनें, ती आधारित आहे हें न समजण्याइतकें स्वतंत्र रूप धारण केलें आहे. तिच्यांतील मूळ कल्पनाच मोठी आकर्षक व हृद्य आहे. पण त्या मूळ कल्पनेलाहि तुम्ही वास्तवाची झालर लावली आहे. भारतांतील सात प्रांतांतील सात रूपसंपन्न युवती आणून तुम्ही केलेला बदल मूळ कल्पनेंत चपखल बसला आहे. या संगीतिकेंत चालीची विविधता असती तर तिचा संगीत-साज खुलला असता.

दुसरी संगीतिका म्हणजे लघुरामायणच. हींत सीतेचें आरंभीं आणि अंतीं भूमीशीं नातें जोडल्यामुळें कथेचा आकृतिबंध पुरा झाला

आहे. मात्र संगीतिकेंत गद्य निवेदनानें सव्वाशेंच्या वर ओळी आडवल्या आहेत. हें गद्याचें पद्यावरील आक्रमण संगीतिकेला मारक ठरतें. हेंच निवेदन पद्यांत असतें तर वातावरण संगीतमय राहिलें असतें.

तिसऱ्या संगीतिकेंत तुम्ही पद्याची विविधता आणली आहे. तींत तुम्हीं गद्य निवेदनाला चांगला पायबंद घातला आहे. मीराबाईची मूळ हिंदी भजनें गोवून भक्तिस्रोताला चांगला वाव दिला आहे.

या संगीतिकांत तुम्हीं कथनकौशल्य, नाट्यात्मकता आणि गेयता साधली आहे. मात्र पौराणिक नाटकांतील सूत्रधाराप्रमाणें तुमचा निवेदक रंगमंचावर फार बोलतो अगर गातो. त्याला खरं म्हणजे तिसऱ्या दर्जाची भूमिका वठवायची असते. भटजीनें लग्नसमारंभांत फार लुडबुड केलेली कोणाला आवडत नाहीं. निरनिराळ्या पात्रांच्या गीतांतून कथा सहज उलगडत गेली पाहिजे. कथा सांगावी लागतां कामा नये.

परिचित कथांवर लिहिलेल्या संगीतिका श्रोत्यांना चटकन समजतात हें खरें. पण त्यांची मौलिकता थोडी कमी होते, असें नाहीं तुम्हांला वाटत ? म्हणून माझी अपेक्षा अशी कीं तुमच्या पुढील संगीतिकांच्या कथावस्तु स्वतंत्र असाव्यात.

एक मंत्र सांगावासा वाटतो. संगीतिका ही कथनात्मक न होता भाववाहक व्हावी. यासाठीं तींत कथन थोडें व भावाविष्करण अधिक असावें. म्हणजेच भावगीतांची ती एक माला असावी. अशा भावगीतांत गुंफलेल्या तुमच्या संगीतिका वाचण्याची इच्छा आहे. आणि ती तुम्ही पुरविली पाहिजे. तुम्हांला एवढें अशक्य नाहीं.

आपला स्नेहांकित,

वसंत वैद्य.

३ नृत्य संगीतिका

★ प्रतिस्पर्धी

★ भूमिबाला सती मैथिली

★ मीराँके प्रभु

स्थिर-चित्र, छाया - अभिनय याकरितां
विस्तृत चित्र-दर्शीका (**Epidiascope**)
चा उपयोग आवश्यक आहे.

व्याजापोटीं——

श्री. के. भि. जोशी
श्री. शं. के. पित्रे
सौ. सुलभा प्रधान
——यांचें प्रोत्साहन,

सौ. कुमुदिनी भागवत
सहकारी वर्ग
व विद्यार्थिनी
——यांचें सक्रीय सहकार्य,

श्रीमती सरोजिनी नायडू
——यांचें ऋण,

कविवर्य वसंतराव वैद्य
——यांचें आशीर्वाद

श्री. गो. धों. फडके
व त्यांचा सहकारी वर्ग
——यांचें नित्य साह्य,

× × × × × ×

या सर्वांच्या
विविध ऋणांतून मुक्त होणे,
अशक्यच,
केवळ व्याजापोटीं
सर्वांचे
' हार्दिक आभार '

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 32228-3 दि: 24/10/4
क्रमांक 95891 नों दि: 7/9/62

अर्पण

हीं दृश्य-काव्यें

त्यांना —

ज्यांच्या प्रोत्साहाने
हीं 'काव्यें'—
जन्मास आलीं.
ज्यांच्या उत्साहाने
हीं काव्यें—
'दृश्य' स्वरूपांत
प्रकट झालीं.
त्या—
सहकारी अध्यापक वर्गास
व
विद्यार्थिनींना—

# प्रतिस्पर्धी

( श्रीमती सरोजिनी नायडू यांच्या Queen's Rival चा स्वैर अनुवाद )

★

दिग्दर्शिका- सौ. कुमुदिनी भागवत
संगीत नियोजक- श्री. गणेशराव मेहेंदळे
संगीत सहाय्यक- ,, व्ही. आर. वैद्य
,, राम सहस्रबुद्धे
नेपथ्य-प्रकाश- ,, प्रभाकर पाध्ये
,, वसंत दातार
पार्श्वगायिका- कु. लता मेहेंदळे
,, कुंदा भडसावळे
,, आशा जोशी
,, प्रमिला आंबीकर
,, विमल मायदेव
,, शकुंतला बोन्द्रे

अभिनय

राणी गुलनार- कु. शोभना मेहेंदळे
राजा फिरोज- ,, श्री ओक
राजकन्या- ,, ज्योति भावे
प्रधान- ,, पुष्पा उपाध्ये
गुजराती युवती- ,, रजनी सरदेसाई
पंजाबी युवती- ,, विमल प्रभु
काश्मिरी युवती- ,, विद्या वैद्य
मणिपुरी युवती- ,, लता दामले
बंगाली युवती- ,, अरुणा रेगे
तेलगु युवती- ,, ज्योत्स्ना त्रैलोक्य
मराठी युवती- ,, कमल जोशी

- प्रथम प्रयोग -

४ मार्च १९६०

पी. ई. सोसायटी,

संयुक्त स्नेहसंमेलन.

सादरकर्ते

न्यू गर्ल्स स्कूल, ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९२५५६

**निवेदक**—भारतापासून दूर.... अति दूर... पार्शियाच्या सौंदर्यवती राणी गुलनारची ही कहाणी. राजा फिरोजसारखा सुंदर, प्रेमळ, शूर पति, लक्ष्मीची जिथें भव्य कृपा, तिथें ही गुलनार दुःखी आहे, कष्टी आहे. तिला सुख नको, सौंदर्य नको, तिला हवी आहे फक्त ईर्ष्या ! तिच्या सौंदर्याला मागें टाकील अशी सुंदरतम युवती... प्रतिस्पर्धी तिला हवा आहे. तिनें आपलें दुःख राजाला.... आपल्या प्रेमळ पतीला निवेदन केलें. राजानें आपल्या प्रधानाला लगेच आज्ञा सोडली, " जा, देशांदेशांतून दूत रवाना करा. माझ्या राणीकरितां एकाहून एक सुंदर अशा सात अप्सरा ताबडतोब माझ्यासमोर हजर करा. "

देशांदेशांतून फिरून सुद्धां निराश झालेले दूत कमळाच्या देशीं, भारत-भूमींत आले. त्यांची इच्छा पूर्ण झाली. एकमेकांना लाजवतील अशा सात अप्सरा पार्शिया नगरींत आल्या. पण.... पण तरीहि राणी दुःखी आहे.

तिचें दुःख कमी होणार कां ? ती सुख उपभोगू शकेल कां ?

( पडदा उघडतो )

( रंगमंचकावर मंद प्रकाश, उदासीन राणी आपल्या मंचकावर आपल्या हातीं दर्पण घेऊन पुन्हां पुन्हां आपलें रूप न्याहाळीत आहे, मध्येंच दुःख सुस्कारे सोडीत आहे. ) राजा फिरोजचा प्रवेश—

**निवेदक**—कोण इथे ही, बसलि मंचकीं लाजवीत रतिला,
सौंदर्याला असल्या, कोठे मिळेल कां उपमा ?
हिरें, माणकें, मोतीं यांची जिथेंच नच गणती;
सुख-जलाशयीं, अशा तळमळे गुल्नार सम्राज्ञी.
हातीं दर्पण पुन्हां पुन्हां ही पाहे सौंदर्या
होइ दर्शने, कमल अधोमुख दर्पणिं चंद्राच्या

**राणी**—" असल्या जिवनीं, हृदया ! नच मी सुखीच आनंदी
गमेल मजला, जीवन माझें झालें, एकाकी ! "

निवेदक—फिरोज राजा वचन ऐकतां झाला दिग्मूढ
करा ठेवूनि मस्तक अपुलें वदलां दुःखांत,

फिरोज—" गुलजार तूं ! गुलनार प्रिय ! कसलें तुज दुःख
काय कमी तर ? इथेच होतो प्रितिचा वर्षाव !
सांग मला गे ! सांग क्षणीं तूं, अपुलें हृद्गत
सांग तुझ्या तूं, सांग मुखानें बघूं नको अंत "

राणी—" नको नको रे, नकोच मजला, सौंदर्याहि असलें
घेऊन दर्शन, पुन्हा पुन्हा तर कंटाळुन गेलें,
मिठावांचूनि अळणी आहे, जीवन हें सारें
सुखाचेंच मी पीत बैसले, आजवरी पेले.
नवीन कांहीं हवेच मजला, माझ्या ह्या जिवनीं
पुरवी माझी मनोकामना, " बोले सम्राज्ञी

निवेदक—सुखातिरेकें कोमजलेलें पुष्प गुलाबाचें
करी प्रार्थना, आर्जवून ही धरुनि चरणातें

राणी—" घेऊन या हो ! प्रतिस्पर्धी मज ही तोडीस तोड !
चेतवील जी हृदयांतील माझ्या ईर्ष्येस "

( रंगमंचकावर क्षणैक अंधार )

## दृश्य २

राजा व प्रधानाचा प्रवेश—

निवेदक—वचन ऐकतां हेंच प्रियेचें, उमगे राजाला
हर्षानें अन वदता झाला अपुल्या मंत्र्याला,

राजा—" दूत पाठवा, दूत पाठवा, देश-विदेशाला
उधळा घोडे, दृष्टी फेंका, जा दाहि-दिशांना.
एकेकाहुन सुंदर ऐशा हव्यात मज ललना
ह्याच अप्सरा, सात सेविका माझ्या राणीच्या,

क्षणाक्षणाला वाट पाहतों, तुमची मी येथें
शोध-शोधुनी आणा, तुम्ही तेजस्वी रत्नें. "
[ मंत्र्याचें प्रस्थान ]

**निवेदक**—कुमुदप्राया, भारत भूमी यक्षाची माया
रती, उर्वशी, रमा, मेनका इथेंच अवतरल्या
कणांकणांतून जन्मा येते, मोहक सुंदरता
सप्त अंगना, आर्या-ललना गेल्या पर्शीया
[ संगीत खंड ]

राणींचा प्रवेश–

[ संगीत खंड ]

सुंदर स्त्रियांसह प्रधानाचा प्रवेश–

**निवेदक**—सप्त तारका आल्या गगनीं चमचमके तेज
धन्य जाहले ह्याच दर्शनें राजाचे नेत्र
[ प्रधानाचें प्रस्थान ]

**राजा**—हांस मदनिके ! हो आनंदी ह्या ललना सात !
जळशिल ना तूं ? पाहून यांना, करतिल ना मात ?

गुर्जर युवती, नीटस बांधा तेजाची खाण
ठुमकत ठुमकत जशी चालते हंसाची चाल !

पांच नद्यांचें पाणी प्याली, पंजाबी नारी
रंग गव्हाचा घेऊन आली तुजला सामोरी.

काश्मिर कन्या रूप-गर्विता परीकथेची नारी
स्वर्गाची तर घेऊन शोभा आली तव दारीं

छम् छम् छम् छम् पैंजण पायीं कृष्णाची राधा,
मणीपुरी ती हीच कामिनी हरील तव बाधा.

कोमल अंगीं, मधुर भाषिणी बंगाली बाला,
चंचल नेत्रीं सदा बघावी, प्रणयाची भाषा

हस्त-पदांच्या पदांच्या दावित मुद्रा, आंध्राची नार
शामल वर्णी गान-कोकिळा करील वरताण !

जरा आगळी वधू मराठी खडकांतील पाणी
सलज्जतेला साथ शीलाची, मदनाची पुतळी,

**निवेदक**—तिच्या भोंवतीं सात उभ्या ह्या मदनाच्या लीला
वस्त्र रेशमी ज्यांत शोभते मोत्यांची आभा
उदासीन ती वदते राणी पाहुन त्या प्रतिमा,

**राणी**—" कुठें कुठें रे ! प्राण ईश्वरा ! माझी ती ईर्ष्या ?
जीवन माझें खरोखरी कां, असेच एकाकी ?
जलाशयीं या मीन तडफडे असून सुखराशी ! "

- रंगमंचकावर क्षणैक अंधार-

## दृश्य ३

**संगीत खंड**-

पार्श्वगीतांतून कोकीळेचे स्वर—

( राणी एकटीच, उदासीन मंचकावर वसली असून हातांत दर्पण आहे )

**निवेदक**—हंसत हंसत वसंत आला; उधळित सुमनांना
पुष्पवती ही वसुधा लागे डोळा-डोलाया
रंग गुलाबी चढूं लागला नूतन पर्णांना,
कोकिळ-कूजन सुरूं जाहले मदनाची किमया !
वातावरणीं असल्या मादक, राणी गुलनार
वसुन आसनीं पाहे दर्पण, अजब दिसे नार !

**राणी**--[ स्वगत ] कुठें, जिवलगा ! शोधूं माझ्या मीं आनंदाला ?
राज दिलवरा !! ग्रहण लागले माझ्या चंद्राला

राजकन्येचा प्रवेश ( वय ४ वर्षे )

**निवेदक**—दुडदुड धांवत लडलड येई राणीची प्रतिमा
नीलवर्णाच्या इवल्या वसनीं इवली चंद्रकला

**राजकन्या** — " आई ! आई !! मला बघूं दे, दे ना आरशाला "

**निवेदक**— गाल फुगवुनी बसे रुसुनी, गोड तीच बाला
हळूंच, हलके ओढून घेई दर्पण ती लीलया
रूप गोजिरें, निरखी नखरे हळवी मानेला
बाल मनींचे सुटूं लागले पतंग, गगनांत
शोधक दृष्टी तशी भिरभिरे, कोन्याकोन्यांत
तीच दृष्टिला तिच्याच येई मातेचें वस्त्र,
लाल ओढणी, तलम रेशमी मोत्याचे कांठ
क्षणांत एका, हात, ओढणी खेंचाया धांवे
क्षणांत दुसऱ्या, नवीन रूपा तिच दर्पणिं देखें

**राजकन्या**—अभिमानानें वदली, आई ! झाल्यें मी आई
पहा पहा ना, तुझ्यासारखी, दिसतें कीं नाहीं ?

**निवेदक**—अमावसेच्या रातराणिला खुलवी हा चंद्र
नैराश्येचा नयनीं चमके, आशेचा किरण
[ राजाचा प्रवेश ]

**राणी**—" सांपडला प्रिय ! सांपडला मज प्रतिस्पर्धि माझा
लेक लाडकी, हा उतारा माझ्या रोगाचा "

**संगीत खंड**

**निवेदक** – उधळित ये, हा वसंत, शोभा राणीच्या महला
सौख्याचा हा वाहूं लागे, मलयानिल वेडा
हर्षोन्मादे पागल राजा उचली कन्येला
साखर चुंबन दोन मुखांनीं मिळे कपोलांना
[ संगीत खंड ]

( **पटाक्षेप** )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३२२२३ वि: ...
क्रमांक ७५६१ नों दि: ...

# —भूमिबाला
# सती
# मैथिली—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३२२२३ वि: ....
क्रमांक ........ नों दि ....

**निवेदक**--अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा मंदोदरी तथा ।
पंचकन्या स्मरेत् नित्यम् महापातक नाशनम् ॥

पुण्यभूमि भारताच्या घरां-घरांतून ज्या पंचकन्यांचें नित्य-नियमानें स्मरण होत असतें, त्यापैकीं एक सीता—

**छाया दृश्य**--[ शेतकऱ्याच्या हातांत एक उघडी पेटी. राजा जनकाच्या दोन्ही हातावर एक लहानसें बालक दोघांच्याहि नजरा त्या बालकावर खिळेलल्या आहेत. ]

—भक्तांचे क्लेष नष्ट करण्याकरिता भू-तलावर नित्य अवतीर्ण होणाऱ्या जगत्पालक विष्णूची रमा-रामावतारीं भू-लोकावर अवतरली ।

यज्ञासाठीं भूमि । नांगरितां धन्या ।
सांपडली कन्या । सीतामाई ॥

वसुधेच्या पोटीं जन्म घेऊन ' भू-माता ' नांव सार्थ केलें. आपल्या जन्माने निपुत्रिक-जनकाला तिनें पावन केलें. तिचा जन्म मिथिला नगरीला पर्वणी प्रमाणेंच वाटला. आनंदाने बेहोष झालेल्या दासी नाचूं लागल्या, गाऊं लागल्या-

ऐकलीत कां ! ऐकलीत कां ? नवलाची वार्ता

## दृश्य १

[ रंगमंचावर प्रकाश-स्रोत, राजकाञ्यांतील एक सभा गृह, दासी फेर धरून नृत्य करीत आहेत. ]

**पहिली दासी**—ऐकलीत कां ? ऐकलीत कां ? नवलाची वार्ता
यज्ञासाठीं नांगरिता भू, सांपडली कन्या.

**दुसरी दासी**--खरच ! अग बाई ! ! सांपडली कन्या ! ! !

**प. दा.**—हो ! हो ! कृष्णीवलाते सांपडली सीता.

**सर्व दासी**-धन्य धन्य तो, धन्य धन्य हा, मिथिलेचा राजा
यज्ञाआधी फलप्राप्तीची घडली ही किमया ॥

प. दा.-बोलति ऋषिगण, माता जन्मे उदरीं कन्येच्या
तप वृक्षाला फळास देउनि उद्धरिलें जनका

स. दा.-चला चला गे ! चला सख्यानो ! पाहूं या बाला
भू-मातेचें रूप गोजिरें जनकाच्या स्वप्ना ॥

( दासींचें प्रस्थान रंगमंचावर हळूं हळूं अंधार )

**निवेदक** — ' ईशकृपेचा प्रसाद ' सीता जनक-गृहीं शुक्ल पक्षांतील शशिकला-प्रमाणे वाढूं लागली. आपल्या बाल वयांतच परशुरामाचें अजस्र शिव-धनुष्य बाल-सुलभ स्वभावानुसार तिनें लीलया हातीं घेतलें, व त्याचा घोडा करून

## दृश्य २

[ रंगमंचावर प्रकाश-झोत धनुष्याचा घोडा करून सीता बसली आहे. त्यावर बसून इकडे तिकडे नाचत आहे. ]

चल रे घोड्या, टक् टक् टक्
असा नाही, तसा नाही, सरळ चल
चल रे घोड्या, टक् टक टक्
असाच कां रे !
मध्यें थांबसी ?
चाबूक नाहीं कां,
तूंच पाहसी ?
तहान लागली
पाणी हवय् ?
चल रे मग
पट् पट् चल
चल रे घोड्या
टक् टक् चल ॥

काटा रे गेला
पायांत काय ?
लंगडत असा
चालतोस काय ?
दमलास काय !
बघते थांब ! !
चल रे चल
पट् पट् चल
चल रे घोड्या टक् टक् टक्

( घोड्यावर बसलेल्या सीतेचें प्रस्थान, रंगमंचकावर हळूं हळूं अंधार )

**निवेदक**—' मी ' ' मी ' म्हणणाऱ्या वीर-वरांनांहि पेलण्यास अशक्य असें तें शिव-धनुष्य बाल-सीता सहजपणें इकडे तिकडे फिरवतें, हा चमत्कार पाहून जनकानें परशुरामाच्या आदेशानुसार शिव-धनुष्याचा पण लावून योग्यवेळीं सीतेचें स्वयंवर मांडिलें. देशोदेशींच्या विवाहोत्सुक नृप व नृप-कुमारांनीं स्वयंवर मंडप सुशोभित केला. शिवधनुष्य मंडपांत आणलें गेलें. आणि....

## दृश्य ३

[ रंगमंचावर प्रकाश-झोत, स्वयंवर-मंडपाचें दृश्य, सिंहासनावर राजा जनक, बाजूला ऋषि विश्वामित्र दुसऱ्या बाजूला सखींसमवेत हातांत वरमाला घेतलेली सीता दोन्ही बाजूंना नृप व नृप-कुमार, मध्यभागी अजस्र शिव-चाप ]

**जनक** - परशुरामाचें धनुष्य शिव हें उचलील जो लीलया
जिंकिल पण तो, रुळेल वक्षीं, सीतेची वर-माला

मध्यभागीं ठेवलेल्या चापाजवळ एक एक नृप येतां, चापाला हात लावतो. पण शेवटीं मान खालीघालून परत आसनस्थ होतो. ' पण ' जिंकणें, ' अशक्य पाहून सर्वजण निराश होतात. राजांची उदासीनता पाहून राजा जनक पण निराश होतो. शेवटीं सर्व राजांना उद्देशून तो आव्हान देतो—

**जनक**—वीर प्रसविनी माता नाही झाली कां जगतीं
टाका शस्त्रें करांत कंकण, दिसती शोभूनी।

(अंतर)

**निवेदक**—गर्वोन्मादे रावण उठला, चकित सभा सारी
भयाकुल ती, सीता होई, देखे दाशरथी
बहु-करांनी उचली रावण त्या शिव चापाला
तोल जाउनी तोंच कोसळे हंसली सारी सभा

(अंतर)

वंदुनि मुनितें विश्वासाने राम ये पूढती
कोमल हस्तें उचली चांपा मुक्त लंकापती
कडाड् होई नाद भयंकर; धनुर्भंग झाला
वरमालेने तोच राम हा, सुशोभित झाला
[ रंगमंचकावर हळूं हळूं अंधार ]

**निवेदक**—सीतेचें स्वयंवर थाटामाटाने पार पडले. माया ब्रह्माचें मीलन झालें. जिवाला शिव भेटलें, अयोध्या नगरी आनंदानें डोलूं लागली-आणि राजा दशरथ रामाच्या राज्याभिषेकाचीं स्वप्नें रंगवूं लागला पण……

**छाया दृश्य**—[ कोपभवनांत कैकयी, राजा दशरथाचें आगमन, कैकयीची समजावणी दुःखी दशरथ ]

………स्वप्न व परिस्थिति यांच्या द्वंद्वांत स्वप्नाची हार निश्चितच असते. मनांतील योजनांचा जन्म काळाच्या जबड्यांत नष्ट होण्या-करिताच असतो बिचारा दशरथ! तो तरी ह्या नियमाला अपवाद कसा ठरावा?

**छाया दृश्य**-[ सुमंत, माता, प्रजा यांच्या समवेत वल्कलें धारण केलेलें राम, लक्ष्मण व अत्यंत साध्या वेषांत सीता दिसत आहे. सर्व जण दुःखी असून ते रामाला परत फिरण्याची विनती करीत आहेत. ]

राज्याभिषेकाच्या ऐवजीं रामाच्या नशिबीं वनवास मात्र आला पतीला छायेप्रमाणें साथ देणारी सीता पति-दिरांसमवेत वनवासांस निघाली.

## दृश्य ४

[ रामा, लक्ष्मण, सीता वनवासी वेशांत, माता कौसल्या, सुमंत, प्रजाजन त्यांच्या मागे आहेत. ]

**निवेपक**–भाग्य फिरलें, काळहि फिरला.

फिरलें चक्र सुखाचें···धृ०

स्वप्न–मंदिरीं स्वर्ग पाहतां
तारकांशी हितगुज करतां
पतिसंगे, ती रात्र संपली

ते क्षण भाग्याचे···१

रविकिरणांचे यतां पक्षी
चैतन्याची कळली महती
अचेतनाचा घाला तोंची

कमल पडलें फिकें···२

जा जा आई, फिर तूं मागे
देई आम्हां आशीर्वादें
वनांत निर्मू राज्य सुखाचें

तुझिया मायेने......३

[ राम, लक्ष्मण, सीता यांचें प्रस्थान, रंगमंचकावर हळूं हळूं अंधार ]

**निवेदक**—दुःखित अंतःकरणानें सर्वांचा निरोप घेऊन पति-दिरांसमवेत सीतची वनयात्रा सुरू झाली.

**स्थिर-दृश्य**—[ राम-सीता, लक्ष्मण, गुह नावेंत बसल्याचें दृश्य ]

गुहाचा निरोप घेऊन चित्रकूट पर्वतावर भरत भेटीनंतर—

**छाया-दृश्य**—[ भरत-भेट ]

ऋषीं-मुनींचें दर्शन घेत-घेत ही त्रिमूर्ति दंडकारण्यांत पंचवटीमध्यें आली वनवासाचीं तेरा वर्षे निर्वेध पार पडली. आणि एक दिवस सीतेच्या जीवनांत दुःख परिवर्तन घडवून आणणारा प्रसंग येऊन ठेपला—

**छाया दृश्य**-- [ शूर्पणखेचें आगमन, लक्ष्मणाशीं संवाद, रामाकडे अंगुली निर्देश, रामाचा नकार, लक्ष्मणाद्वारा शूर्पणखेला कर्ण-नाशिकाहीन करुन विद्रूप करणें]

शूर्पणखेने आश्रमांत प्रवेश केला. समोरच बसलेल्या मदनरुप लक्ष्मणावर मायावी सौंदर्याची मोहिनी घालण्याचा निष्फळ प्रयत्न केल्यावर, ती रामाकडे वळली. पण पत्नीव्रती रामाने स्पष्ट इन्कार करुन लक्ष्मणाला खुणावले. शूर्पणखा कर्ण-नासिका हीन होऊन अधिकच विद्रूप बनली. चिडलेल्या शूर्पणखेने रावणाशी सीतेला पळविण्याचा घाट घातला. मामा मारिचाने त्याला साथ दिली. सुवर्ण मृगाचें मिष धारण करुन तो सीतेच्या आश्रमाभोंवती फिरुं लागला. सीतेवर मोहिनी पडली, आणि आपल्या पतीला आर्जवाने सांगू लागली---

### दृश्य

( आश्रमांतील दृश्य, राम, सीता, लक्ष्मण कुटीबाहेर उभे आहेत. )

**सीता**— सुवर्ण -मृगा त्या पाहियले ना !

राघवा ! आणुनि मज तो आणुनि द्या ना ! !

रुप मनोहर किती तयाचें
सुवर्ण-अंगी तारे नभिंचें
नयनीं खेळ तजे हिऱ्याचे
हीच मोहिनी रोखी चरणां...... १

मृगासनीं त्या बसवुनि तुम्हां
डोळे भरुनि पाहिन रुपा
सिंहासन हे वनांत, राया
करुनी मृगया आणा आणा...... २

**राम**-- नको बळी तूं पडूं जानकी
भीषणतेची हीच निशाणी
ओळख माया रुपहि नकली

( अंतर )

तुझ्या आर्जवें जातों मी हीं

( प्रस्थान )

( अंतर )

**मायावी हांक**— हा सीते ! हा लक्ष्मणा ! ! धांव धांव झडकरी
बंधो ! बाण गेला उरीं ! !

**सीता**— ऐका ! ऐका ! ! धावा धावा
वाचवा पतिराया.
मीच अभागी कशी सारली
पतिदेवाची छाया !

**लक्ष्मण**— शोक वृक्षा कां करिशी !
अजिंक्य रामासाठीं !
नाद ओळखी हा मायावी–
शक्ति बंधोपाटीं ! !

**सीता**–बंधूवरची प्रेम भावना
विसर कसा पडला ?
लाज न वाटे कशी मनाला
वासनेंत हो बुडला

**लक्ष्मण**–जातों मी पण, जाऊं नको तूं
ओलांडूनी रेषा
निशाचरांची मायानगरी
इथेच घाली पिंगा
( अंतर )

**यति**–दारीं आला यति,
भिक्षा वाढा हो माई !

**निवेदक**–यतिवेशाने येउनि रावण उचली सीतेला
अकाश मार्गे घेउनि जाई अपुल्या नगरीला
( अंतर )

**राम**-हे वृक्षांनो ! पाहिलित कां सीता
माझी प्रिया
हे सरितांनो ! हे पक्षांनो ! ! पाहिलित कां ?
सांगा, सांगा, ..........

**निवेदक**--.........वेडा राम आजि झाला

( अंतर )

**जटायू**--दक्षिण पंथे नेली सीता लंका नगरीला

**निवेदक**--कथी जटायू, सोडी प्राणा, कृतकृत्य झाला.

[ रंगामंचावर हळूं हळूं अंधार ]

**निवेदक**--लक्ष्मणासह रामाने दक्षिणापथे गमन केले. वाटेतच सुग्रीव-हनुमानाची भेट झाली व त्यांच्या साहाय्याने रावणावर चढाई करण्याची योजना आखण्यांत आली.

**स्थिर-चित्र**---[ हनुमानांचं सागरोल्लंघन ]

सीतेचें कुशल पाहण्याकरिता वायु-पुत्र सागरोल्लंघन करून सुवर्ण-नगरी लंकेला आला. अशोक-वनांत कृशतनु, तेजस्वी जानकीचें दर्शन त्याला घडलें. आपली ओळख पटविण्याकरिता व रामरायाचे कुशल-वर्तमान सांगण्याकरिता हनुमानानें रामाची मुद्रिका सीते-समोर फेंकली. निराशेच्या अंधःकारांतील तो आशेचा किरणच होता. मुद्रिका पाहतांच सीता आनंदून गेली

## दृश्य ६

( रंग मंचावर प्रकाश, वृक्षाखालीं दुःखित सीता, तिच्या दोन बाजूला दोन विद्रूप राक्षसीणी निद्रित अवस्थेत )

**निवेदन**---नैराश्येच्या अंधःकारीं किरण आशेच्या

ओळखीची हीच मुद्रा

आनंदिन ही सीता सु-भद्रा –

चकित देखे अंवती-भवती

वनीं अशोका, आली कैसी !

तोंच पाहिलें वायू-पुत्रा

शालिनेतच्या त्याच सुपुत्रा

**हनुमान** पवनसुत मी हनुमान

देवी ! राम दूत मी दास······

रघुनाथांच्या आज्ञेवरुनी,

कुशल पुसण्या आलों लंकीं,

द्या संदेश देवा कांहीं,

आशीर्वाद दासास······

**सीता**-मुद्रिकेच्या ह्या रुपानें, पति दर्शन घडलें

दूता ! धन्य मला केलें···

अवधपतीसी सांग जाउनी,

सेना घेउनि याच सत्वरीं

मुक्तीसाठीं आसुसलेली

वाट सती पाहे···

[ मारुतीचें सीतेस वंदन करुन प्रस्थान, रंगमंचावर अंधार ]

**निवेदक**--सीतेचा संदेश श्री रामचंद्रापर्यंत येऊन पोहोंचला. युद्धाची तयारी

**स्थिर चित्र**--[ सागराचें गर्वहरण, सागर देवाची क्षमा--याचना ]

सागराचें गर्वहरण करुन त्यावर सेतु--बंधन झालें. रामाची वानर--सेना लंकेपर्यंत येऊन पोहोंचला.

**स्थिर-चित्र**—[ रावण दरबारीं अंगद शिष्टाई ]

अंगदाच्या निष्कळ शिष्टाईनंतर युद्धास तोंड लागलें, अनेक रथी महारथी युद्धांत कामास आले.

**स्थिर चित्र**—[ दशाननाचा रणभूमीवर वध ]

दशाननाचा वध होऊन लंका-नगरी देवांसमवेत असुर-दास्यांतून मुक्त झाली. सीतेला अत्यानंद झाला.

**छाया दृश्य**—[ राम-सीता भेट ]

पण...पण तो आनंद जास्त वेळ टिकूं शकला नाही. परगृहीं राहिल्या पत्नीचा स्वीकार करणें लोकपालक रामाला लोकापवादामुळें शक्यच नव्हते.

निराशा, लोक निंदा, दुःख त्या सतीस सहन होऊं शकले नाहीं. प्राणत्यागाची इच्छा तिन दर्शविली. अति दुःखाने लक्ष्मणाने अग्नि-प्रवेशाची तयारी करुन दिली. रामाने आपलें हृदय कठोर केलें. धगधगल्या अग्नींत प्राणार्पणास सीता उद्यत झाली.

पावित्र्याला कलंक ! काळा ! खरोखर धन्य धन्य तुझी लीला ! !

## दृश्य ७

[ रंगमंचावर प्रज्वलित अग्नि, दोन्हीं बाजूला सैन्य, राम, लक्ष्मण आदि उभे आहेत. अग्निजवळ सीता अग्नीस प्रणाम करीत आहे. ]

**निवेदक**---पावित्र्याची आज परीक्षा,
धगधगला अग्नि
काळा ! अजब तुझी करणी.......
अग्नीहूनहि तेजस्वी जी,
जलाहूनहि निर्मळ जिवनीं
अंकरहित ही निरभ्र गगनीं
त्या साध्वीची आज कसोटी......
( अग्नि प्रगट होतो.)

**अग्निदेव**---- त्रिवार रामा, मीच सांगतों
सतीवर संशय घेऊं नको
पावित्र्याला मलिनतेची
स्पर्श-कल्पना करूं नको
जनांसमोरी विचार भलता
मनांत कसला आणूं नको
शुद्ध सीतला स्थान भ्रष्ट-तूं
अपुल्या जिवनीं करूं नको.
( सर्वांचा अग्निदेवाला प्रणाम. रामाकडून सीतेचं ग्रहण )

92556

**सर्व**— जय रघुकुल तिलक, जय जय सती जानकी
जय जय सीता-राम......

(जयजयकाराचा आवाज मंद मंद होत जातो व रंगमंचावर तसा तसा अंधार )

**स्थिर चित्र**-[ राम, लक्ष्मण, सीता, हनुमान पुष्पक विमानांत बसले आहेत. ]

**निवेदक**--रावण-बंधु, राम-भक्त विभिषणानें दिलेल्या पुष्पक विमानांत बसून प्रभु रामचंद्र सपरिवार अयोध्येकडे निघाले, सीमेबाहेर एकांती निरीच्छ वृत्तीने राम--पादुकांची पूजा करीत राज्य-शकट हाकलणाऱ्या राम-भरताची भेट झाली—

**छाया दृश्य**-[ राम-भरत मिलन ]

—सत्, चित् एक झालें. सर्वांनी हर्षाने अयोध्येंत प्रवेश केला. रामाच्या राज्याभिषेकाची तयारी सुरूं होऊन राज्याभिषेक विधि यथासांग पार पडला. कांहीं दिवसानंतर सीतेनें एकांतांत आपलें गुपित रामचंद्राच्या कानीं सांगितलें—

**छाया दृष्य**–[ राम-सीतेचा एकांत, सीता रामास आपलें गुपित सांगत आहे. ]

**( पार्श्वगीत )**--गुपित सांगते लाजुनि सीता एकांतीं नाथा
वनांत जावें विचरण मोदें, मनांत ये माझ्या
हृदय-ईश्वरा ! यावें संगे, पुरवावी इच्छा
मातृपदाची मधुर कल्पना, सांगे हृद्-नाथा

सीतेला प्रेमभराने जवळ घेत, अत्यानंदे त्याने हंसून संमति दिली खरी पण त्याच वेळेस सीतेच्या अनुपस्थितींत गुप्तचराकडून सीतेच्या पावित्र्यावर रजकाकडून घेतला गेलेला संशय सांगितला गेला. अग्निदेवांकडून शुद्धतेची साक्ष मिळून सुद्धा प्रजाजनाकडून घेतला गेलेला आक्षेप लोक-पालक प्रभूला दुःख दायक वाटला. आपलें मन घट्ट करून सीतात्यागाची त्याने तयारी केली. लक्ष्मणाला तसा संदेश दिला गेला.

**स्थिर-चित्र**--[ लक्ष्मणासह सीता रथांत बसून वनगमनास जात आहे. ]

भविष्याची कोणत्याच प्रकारची कल्पना नसलेली सीता रामविरहित वन विहार होणार म्हणून दुःखानंद मिश्रित भावानें लक्ष्मणावरोबर निघाली वनांत पोहोंचल्यावर लक्ष्मणाकडून सत्य परिस्थितिचें आकलन होताच सीतेवर दुःखाची कुऱ्हाडच कोसळली. क्रोध व दुःख तिचे स्थायी भाव बनले....

### दृश्य ८

[ वनांतील दृश्य, वृक्षाखालीं सीता, बाजूलाच खालीं मान घालून लक्ष्मण उभा आहे. ]

**(पार्श्वगीत)**–स्त्री जीवनाची करुण कहाणी मूर्तिमंत सीता
सौख्य खजिना, अबला जिवनीं सदाच आहे रिता

[ अंतर ]

**सीता**—रघुकुल भक्ता ! जाऊ कुठे मी ? निर्वासीत केलें
मीच पापिणी, कुलकरंटी फिरुनी रे ठरलें
अग्निदेवता खोटी येथ आज ठरावी नां !
सत्याचीही ग्वाही अजुनी तरी फिरावी ना !
नाही दुहिता, नाही भार्या, झालें परित्यक्ता
कठोर वचनें, मीच बोलतें राम फक्त राजा।

**निवेदक**– दुःखित हृदयीं, वाचा बसली अश्रु बोलती वाणी
लक्ष्मणाने निरोप दिधला, करीं मुखा झाकोनी
( लक्ष्मणाचें प्रस्थान, रंगमंचावर अंधार )

**निवेदक**—सीता त्या वनांत एकाकी झाली. मायेचे, प्रेमाचे सर्व पाश तटातट तुटून गेले. जगन्माता आज निराश्रित झाली. पण......दैव संकेत तसा नव्हता.........

**छाया दृश्य**—( महामुनि वाल्मिकी भेट )

.........महामुनि वाल्मिकीच्या दिव्य-दृष्टीने सीतेला ओळखले, परिस्थिति ओळखली. सीतेला त्यांनी आपल्या आश्रमांत नेली. जानकी तेथे वाल्मिकींची कन्या झाली. त्याच आश्रमांत सीतेने मातृपदाचें सुख अनुभविलें. रघुकुल दीपक लव-कुशाचा जन्म त्या आश्रमांत झाला.

योग्यवेळीं वाल्मिकींच्या मार्गदर्शनाखाली ते विविध-विद्या संपन्न झाले. त्यांच्या वयांचीं बारा वर्षे तेथे पार पडलीं.

आणि एक दिवस——

**स्थिर-चित्र**—[ लव-कुशाकडून अडवलेला, रामाच्या अश्वमेधाचा घोडा, समोरच सेनेसह युद्धास सज्ज लक्ष्मण ]

प्रभु रामचंद्राच्या अश्वमेध यज्ञाच्या घोड्याने आश्रमांत प्रवेश केला. लव-कुशानें त्या घोड्यास पडकले. घोड्याचें रक्षण करण्याकरितां चाललेल्या ससैन्य लक्ष्मणानें त्यांना पुष्कळ समजावले भीति दाखविली. पण त्या वीर-पुत्रांचें साहस त्यामुळें अधिकच वाढले. युद्धास तोंड फुटलें. लक्ष्मण पराजित झाला. प्रत्यक्ष राम युद्धाकरितां आले. तेंथेच पिता-पुत्रांची ओळख पटली—

**छाया-दृश्य**—[ वाल्मिकीच्या आश्रमांत पिता-पुत्र मिलन ]

सीता आनंदित झाली. पश्चातापदग्ध रामाने तिला अयोध्येस परत चलण्याची विनवणी केली. पण स्वाभिमानी सीता पुत्रांना पित्याच्या हवाली करून ऋणांतून मुक्त झाली. आणि आपल्या मातेला वसुधेला प्रार्थना करती झाली...

## दृश्य ९

( राम, सीता, लक्ष्मण, लव, कुश, वाल्मिकी रंगमंचावर लवकुश रामाजवळ उभे आहेत. ]

**सीता**—घे उदरीं माते, वसुधे !

कन्या तुज विनवी

असह्य ही जीवन गाथा

पूर्ण तिला करवी

नको नको जीवन असलें

हे लाजिरवाणें

मायेनें घेऊन जवळीं

मुक्ति मला देणें.

( जमिन दुभंगल्याचा अवाज, क्षणभर रंगमंचावर अंधार, सीता गुप्त होते, परत प्रकाश, त्या स्थानावर स्वर्गातून पुष्पवृष्टि, राम, लक्ष्मण, लव, कुश, वाल्मिकी त्या जागीं वंदन करतात. )

**पार्श्वगीत**—भूमिकन्या गेली सीता वसुधेच्या उदरीं
दुःख स्मृतींना ठेउनि जगतीं अजरामर झाली
वंदन अमुचें माते लक्ष्मी ! लीन तुवा चरणीं
तुझ्या स्मृतींनी, उजळे जीवन धीर मना येई.

[ पटाक्षेप ]

# मीराँके प्रभु

-: सादरकर्ते :-

न्यू गर्ल्स् स्कूल, ठाणें.

★

- अभिनय -

मीरा- कु. ज्योत्स्ना त्रैलोक्य
कृष्ण- ,, सुरेखा देसाई
राणा- ,, विजया सरदेशमुख
मंत्री- ,, कुंदा वैद्य
सेवक- ,, शकुंतला लढे
दासी- ,, शोभना पालये
भक्तजन- ,, मंगला काळे,
,, कुमुदिनी घैसास
,, निशा कोल्हटकर
,, बेबी लढे

दिग्दर्शिका- सौ. कुमुदिनी भागवत
नृत्य- कु. ज्योत्स्ना त्रैलोक्य
संगीत-नियोजन- श्री. गणेशराव मेहेंदळे
साथ-पेटी- ,, राजा पेठे
तबला- ,, कृ. द. चोळकर
व्हायोलिन- ,, गणेशराव मेहेंदळे
बांसरी- ,, अरविंद कारखानीस
प्रकाश-योजना- ,, के. व्ही. सोमण
,, प्रभाकर पाध्ये
नेपथ्य- ,, प्रभाकर पाध्ये
,, वसंत दातार

- पार्श्व गायिका -

कु. लता मेहेंदळे,
कु. कुंदा भडसावळे,
कु. लता दामले.

※

प्रथम प्रयोग
फेब्रुवारी १९६२
(पी. ई. सोसायटी, ठाणें.
रौप्य महोत्सव)

※

**स्थिर चित्र**—राजपुतानाच्या पार्श्वभूमिवर मीरेचें चित्र—

**निवेदक**—मैं तो प्रेम दीवानी
मेरो दरद न जाणे कोई ॥

ह्या एकाच चरणांत जिने आपलें जीवनसार साठविलें आहे, ती मीरा. राजपुतान्याच्या मेवाड कुलांत राज-स्त्री म्हणून तिने प्रवेश केला. पण, पतिपेक्षां परमेश्वरालाच तिनें अधिक जवळ मानले, आणि सर्वांच्या रोषास ती कारण ठरली. पति निधनानंतर संत-संग ईश्वर-भजन हेंच तिचें सर्वस्व ठरलें. राजकुलांतील स्त्री कुल-मर्यादा सोडून चार-चौघांत मिसळते, नाचते, गातें, ही घटनाच असह्य होती. आणि मग...राजवाड्यांत तिच्या खुनाचे कट शिजूं लागले....गरीब बिचारा मानव...परमेश्वराच्या अगाध लीलेचा महिमा त्याला कसा कळावा ? आणि ईश-स्तवनांत तल्लीन झालेल्या मीरेला तरी कशाची काळजी ? ती नृत्यांतच रंगलेली ! टाळ-मृदंगाची साथ...भजनाचे सूर... आणि गोपाल कृष्णाचें सान्निध्य, हेंच तिचें विश्व ! !

**छाया-दृश्य**-मीरेचें नृत्य, सभोंवताली संत-जन.

**पार्श्वगीत**—भजन

पग घुंगरु बाँध मीराँ नाची रे !
मैं तो मोरे नारायणकी आपही हो गयी दासी रे ॥
लोग कहें मीरा भई बावरी, न्यात कहें कुलनासी रे ॥
[ पडदा वर होतो. रंगमंचावर प्रकाश झोत ]

**निवेदक**—पैंजण पायीं, हातीं वीणा, नाच नाचेत मीरा
पुढें कन्हैया सभोंवताली संत जनाचा मेळा
राजपुताना राजपुतांची वैभवशाली गाथा
त्या गाथेचा एक चरण हा व्यथित मीरेची कथा

[ राणा विक्रमाचा प्रवेश, परपुरुषांसमवेत भजन व नृत्य पाहून त्याच्या अंगाची आग आग होते ]

राणा विक्रम बघता भासे क्रोधाग्नीचा पुतळा
येथ अवतरे रुद्र होऊन एकलिंगजी भोळा
जन लज्जेला तुडवून पायीं येथं नाचतें मीरा
राज-कुलाला कलंक लावुनि मिरवी आपुला तोरा
सहनशीलता सांगे येथें संपे माझी सीमा
चितोड वंशा शुद्ध करावें आणुन तिज कामा !

( क्रुद्ध राणाचें प्रस्थान )

सूड भावना मनांत ठेवुन परत पातला भला !
कोमलतेच्या अंशा हरुनि अवाहना दे खला ! !

[ रंगमंचावर हळूं हळूं अंधार ]

## दृश्य २

[रंगमंचावर प्रकाश ]

[ श्रीकृष्णाच्या मूर्तीचें पूजन होत असल्याचें दृश्य ]

**निवेदक—** मीराँके, प्रभु गिरधर नागर सहज मिलो अविनासीरे ।
धांव धांव प्रभु, नंदनंदना ! हांक तुवा आली रे ॥
संगे भक्ता भजन करितां तल्लीन ही मीरा रे ।
दासी मीरा गुपाल गिरधर तारो अब मोही रे ।

[ हातांत विषाचा पेला घेऊन सेवकाचा प्रवेश ]

तोच पातला सेवक घेऊन कालकुटाचा पेला
सेवक रूपें, काळ उभा हा सतभजनाच्या वेळा
राणाजीचें कृत्य विषारी जाणुन, घेई चषका
ईशकृपेची असता छाया, कोण विचारी मषका !
राम जपाने अमृत मंथनी नीळकंठ, शिव झाला.
नामस्मरणें अमृत बनेल होता स्पर्श विषाला

[ मीरेचें विष प्राशानानंतर नृत्य ]

उन्मादानें पागल होऊन नाच नाचते नाचा
मुरलीच्या ह्या मधुर स्वराते स्वर मृदंग नादाचा

[ राणाचा प्रवेश ]

अघटित घटना घटता पाहुनी घट घटीत हो राणा
विष सूडाचें ठेवुन हृदयीं बनला तोच वि-राणा

[ राणाचें चडफडत प्रस्थान ]

पार्श्वगीत---भजन

राणाजी जहर दियो मैं जाणी
जिण हरि मेरचो नाम निवरचो छारचौ दूध अरु पानी
स्वपच भगत वारौ तन मन ते, हौं हरि हाथ बिकानी।
मीराँ प्रभु गिरधर भजिबेको संत चरण लिपटानी ॥

[ रंगमंचावर अंधार ]

## दृश्य ३

**छाया दृश्य**---- (राणा व मंत्री यांच्या कानगोष्टीचा पडद्यावर छाया अभिनय )

**निवेदक**--- खलाधम कुणी कानीं लागे राणाच्या एकान्तीं
हळूंच सांगे, " मध्यरात्रीला ढळते तेथे शान्ती
कुजबुज येतें ऐकूं कर्णीं, कमल कलंकित होई
विधवेचें हें जगता जीवन पापाचरणा घेई, "
बोल ऐकतां शरीर पेटले आग आंग ओती
नयनांतील हे दोन निखारे प्रज्वलित होती
खसकन् उपसुनी तेज असीते घेई आपुल्या हातीं
" आज अंत हा, ह्या पापाचा करीन माझ्या हाती.

[ रंगमंचकावर मंद प्रकाश ]

[ मीरा भजन करीत बसली आहे. ]

चोर पावलें येई राणा पावनेतच्या गेहातें
कान देऊनि हळूंच ऐके परपुरुषाच्या वाणीतें
मंगलतेला पापी देखे अमंगला पापीणी
कमल फुलाच्या सोडुन रूपा पंकाते वाखाणी



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32223 ... दि: ........
क्रमांक ९५४७ ........ नों दि ........ ३/१२/८२

राणा विक्रम बघता भासे क्रोधाग्नीचा पुतळा
येथ अवतरे रुद्र होऊन एकलिंगजी भोळा
जन लज्जेला तुडवून पायीं येथं नाचते मीरा
राज-कुलाला कलंक लावुनि मिरवी आपुला तोरा
सहनशीलता सांगे येथें संपे माझी सीमा
चितोड वंशा शुद्ध करावें आणुन तिज कामा !

( क्रुद्ध राणाचें प्रस्थान )

सूड भावना मनांत ठेवुन परत पातला भला !
कोमलतेच्या अंशा हरुनि अवाहना दे खला ! !

[ रंगमंचावर हळूं हळूं अंधार ]

## दृश्य २

[रंगमंचावर प्रकाश ]

[ श्रीकृष्णाच्या मूर्तिचें पूजन होत असल्याचें दृश्य ]

**निवेदक—** मीराँके, प्रभु गिरधर नागर सहज मिलो अविनासीरे ।
धांव धांव प्रभु, नंदनंदना ! हांक तुवा आली रे ॥
संगे भक्ता भजन करितां तल्लीन ही मीरा रे ।
दासी मीरा गुपाल गिरधर तारो अब मोही रे ।

[ हातांत विषाचा पेला घेऊन सेवकाचा प्रवेश ]

तोच पातला सेवक घेऊन कालकुटाचा पेला
सेवक रूपें, काळ उभा हा सतभजनाच्या वेळा
राणाजीचें कृत्य विषारी जाणुन, घेई चषका
ईशकृपेची असता छाया, कोण विचारी मषका !
राम जपाने अमृत मंथनी नीळकंठ, शिव झाला.
नामस्मरणें अमृत बनेल होता स्पर्श विषाला

[ मीरेचें विष प्राशानानंतर नृत्य ]

उन्मादानें पागल होऊन नाच नाचते नाचा
मुरलीच्या ह्या मधुर स्वराते स्वर मृदंग नादाचा

[ राणाचा प्रवेश ]

अघटित घटना घटता पाहुनी घट घटीत हो राणा
विष सूडाचें ठेवुन हृदयीं बनला तोच वि-राणा

[ राणाचें चडफडत प्रस्थान ]

पार्श्वगीत--भजन

राणाजी जहर दियो में जाणी
जिण हरि मेरचो नाम निवरचो छारचौ दूध अरु पानी
स्वपच भगत वारौ तन मन ते, हौं हरि हाथ बिकानी ।
मीराँ प्रभु गिरधर भजिबको संत चरण लिपटानी ॥

[ रंगमंचावर अंधार ]

## दृश्य ३

**छाया दृश्य**---- (राणा व मंत्री यांच्या कानगोष्टीचा पडद्यावर छाया अभिनय )

**निवेदक**-- खलाधम कुणी कानीं लागे राणाच्या एकान्तीं
हळूंच सांगे, " मध्यरात्रीला ढळते तेथे शान्ती
कुजबुज येतें ऐकूं कर्णीं, कमल कलंकित होई
विधवेचें हें जगता जीवन पापाचरणा घेई, "
बोल ऐकतां शरीर पेटले आग आंग ओती
नयनांतील हे दोन निखारे प्रज्वलित होती
खसकन् उपसुनी तेज असीते घेई आपुल्या हातीं
" आज अंत हा, ह्या पापाचा करीन माझ्या हाती.

[ रंगमंचकावर मंद प्रकाश ]

[ मीरा भजन करीत बसली आहे. ]

चोर पावलें येई राणा पावनेतच्या गेहातें
कान देऊनि हळूंच ऐके परपुरुषाच्या वाणीतें
मंगलतेला पापी देखे अमंगला पापीणी
कमल फुलाच्या सोडुन रूपा पंकाते वाखाणी



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलमत.
अनुक्रम 32223 वि: ......
क्रमांक 9549 ...... नों. दि. 3/12/62

( भजन चालू असता राणाचा प्रवेश)

" बोल बोल गे ! सांगे दुष्टे ! ! बोल कुणाची वाणी ?
पाप पाहिलें मीच ऐकिलें माझ्या ह्या कानांनीं "
" कुणीच नाही, कुणी नाहीं हो मीच एकली रंगे
छेल छबिला एक कन्हैया रमते त्याच्या संगे.
दासी त्याची मी जन्माची पतिसेवा मी करते "
गंभीर मुद्रा मीरा सांगे हृदयांतील भावांते
बोल भाबडे अर्थ न उमगे, क्रोधांधाची महती.
अणूं अणूंतुन, कणांकणांतुन असते ज्याची वसती

( राणाची सर्वत्र शोधक दृष्टि )

कृष्ण कन्हैया तो पाप्याच्या नजरेंत कसा येई
महासंशयी शोध-शोधुनी गलित गात्रहि होई.
पराभवाचें दर्शन होता
राजपुताचा अपमान !
अबलेवरती सूड घ्यावया
महान होतसे सान.
जाता जाता वदला राणा, " कुठे लपविशी पाप ?
पदरिं तुझ्या गे, घालिन मीहि तव पापाचें माप. "

( राणाचें प्रस्थान )

**मिरेचें भजन**–मैं तो गिरधरके घर जाऊँ।
गिरधर म्हाँरो साँचो प्रीतम, देखत रूप लुभाऊँ ॥
मेरी उनकी प्रीत पुरानी, उनबिन पल न रहाऊँ ॥
मीराँके प्रभु गिरधर नागर, बार बार बलि जाऊँ ॥

## दृश्य ४

**छाया दृश्य**–( राणा व मंत्री यांच्या कानगोष्टींचा छाया अभिनय )

निवेदक—गुप्त बैठकीं विचार चाले खलपुरुषांचा मेळ
नष्ट करावा अन्तिम आता सती-भक्तीचा खेळ !
" सर्प विषारी भेट पाठवा शाळीग्रामा हार
अहि दंशाने येईल मृत्यु यांत न आपुली हार !
विजय-श्रीचा कोण कसा रे करिल इथें अपहार
स्वच्छंदानें करितां लीला मिळेल तिज उपहार
[ रंगमंचकावर मंद प्रकाश-भजनाच्या तालावर मीरेचें नृत्य श्रीकृष्णाच्या मुरली वादनाचा छाया अभिनय ]
गुपाल कृष्ण, राधा कृष्ण गुपाल राधा कृष्ण
नाचे मिराँ, भक्त नाचती डोल डोलतो कृष्ण
पार उतारी जहाज माझें भवसिन्धुतून आतां
नाच नाचुन थकलें मी रे सोडव सोडव कान्ता !
( दासीचा पेटी घेऊन प्रवेश )
तोच पातली हीच सेविका घेऊनि नजराणा
भाविक हृदयें वदती झाली वंदूनी चरणांना
सुमन सुशोभित पाठवी माला कंसारीच्या शरणा
भाविक हृदयें विनीत राणा झाला नत तव चरणा.
( मीरा पेटीचा स्वीकार )
भक्तिभाव स्पर्श करीते श्रीकृष्णाची दासी
उघडूनी अन उत्सुक पाही प्रियतम शेष-निवासी
भक्तवत्सल तोच मुरारी अगाध लीला दावी
निर्गुण तेथे सगुण होऊन जहरा चंदन बनवी
तिथेच नव्हता सर्पहि आतां
नव्हते विष विषारी
शेष, होऊन सुमन मालिका
पाशवतेला हारी ॥
( रंगमंचावर मंद प्रकाश )

मराठी ग्रंथ ... ९२८५४६ ... दा. क्र.

**मीरेचे भजन**—( श्रीकृष्णाच्या मुरलीवादनाचा छाया अभिनय )

आज मैं देख्यौ गिरधारी ।
सुंदर बदन मदनकी सोभा चितवन अनियारी
बसै रहै निसी दिन हिरदै बीच टरै नहीं टारी ॥
वाहीपर तनमन हे वारी ।
गिरधर लाल नवल नट नगर मीराँ बलिहारी ॥

( मीरेचा पत्र लेखनाचा छाया अभिनय )

**निवेदकः**—" भक्त श्रेष्ठा भारत रूपा श्री तुलसीच्या दासा !
विनीत मीरा तव चरणा ही, इथे अडकली फांसा
भक्ति होइना, स्तवन जमेना विघ्नें सतरा पाटीं
क्षणाक्षणाला, कणांकणांतून विरोध माझ्यासाठीं
कुटील मारा सहते सारा, सांपडलें मी कारा
प्रभात तारा, अढळ सहारा तुम्हीच मज तारा.
तिमिरांतूनी पथा दाखवी हीन दीन मीरा
पत्रा लिहिते रक्तानें नर तुलसीनें मीरा

( तुलसीच्या पत्र लेखनाचा छाया अभिनय )

" प्रीय न ज्याला राम-जानकी त्यागी तूं त्यासी
प्रीय पावन-पद जरि तुज असती, त्यागी तूं त्यासी

( रंगमंचकावर मंद प्रकाश. मीरेचा प्रवेश, तिच्या मागून अन्य संतजन व शेवट राणा )

प्रमाण मानुनि तुलसी वचनां त्यागी ती त्यांसी
परमात्म्याच्या मीलनास्तवहि त्यागी ती त्यासी

मीरेचें वृंदावनाकडे गमन—

चालली मीरा वृंदावनाला
हृदयीं धरुनी नंदनंदनाला
व्रजभूमीच्या अणूरेणूला
धन्य वाटलें मना-मनाला.

संगीत चालू असतां—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत. [ पटाक्षेप ]

 क्रमांक ...३२२२३... दि: ...५/७४...
क्र ...७५६९... दि ...८/१/८२ 

REFBK-0012756
REFBK-0012756

मराठी ... दा. क्र. ९२८०५६

**मीरेचे भजन**—( श्रीकृष्णाच्या मुरलीवादनाचा छाया अभिनय )

आज मैं देख्यौ गिरधारी ।
सुंदर बदन मदनकी सोभा चितवन अनियारी
बसै रहै निसी दिन हिरदे बीच टरै नहीं टारी ॥
वाहीपर तनमन हे वारी ।
गिरधर लाल नवल नट नगर मीराँ बलिहारी ॥

( मीरेचा पत्र लेखनाचा छाया अभिनय )

**निवेदकः**–" भक्त श्रेष्ठा भारत रूपा श्री तुलसीच्या दासा !
विनीत मीरा तव चरणा ही, इथे अडकली फांसा
भक्ति होइना, स्तवन जमेना विघ्नें सतरा पाठीं
क्षणाक्षणाला, कणांकणांतून विरोध माझ्यासाठीं
कुटील मारा सहते सारा, सांपडलें मी कारा
प्रभात तारा, अढळ सहारा तुम्हीच मज तारा.
तिमिरांतूनी पथा दाखवी हीन दीन मीरा
पत्रा लिहिते रक्तानें तर तुलसीनें मीरा

( तुलसीच्या पत्र लेखनाचा छाया अभिनय )

" प्रीय न ज्याला राम-जानकी त्यागी तूं त्यासी
प्रीय पावन-पद जरि तुज असती, त्यागी तूं त्यासी

( रंगमंचकावर मंद प्रकाश. मीरेचा प्रवेश, तिच्या मागून अन्य संतजन व शेवट राणा )

प्रमाण मानुनि तुलसी वचनां त्यागी ती त्यांसी
परमात्म्याच्या मीलनास्तवहि त्यागी ती त्यासी

मीरेचें वृंदावनाकडे गमन—

चालली मीरा वृंदावनाला
हृदयीं धरूनी नंदनंदनाला
व्रजभूमीच्या अणूरेणूला
धन्य वाटलें मना-मनाला.

संगीत चालू असतां—

[ पटाक्षेप ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.



अनुक्रम ३२२२३ दि: ५।०४
क्रमांक ७५६९ नों दि ०१।२।०२

हिन्दी व्याकरणाची पूर्व तयारी —

# व्याकरण-प्रभा

( किरण - १ व २ )

रचयिताः-प्रभाकर पाध्ये

किंमत ७० नये पैसे

राष्ट्रभाषा-हिन्दी-वर्ग, प्रकाशन, ठाणें.